**मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका**
**कार्यालय पोलीस अधीक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**

**अ.क.24 दिनांक 09.06.2025 ते 13.06.2025 ( भाग 1 ते 5 )**

# भाग –1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदान्नती)

**१) कमांकः–नाजिग्रा/डि–9/अनुकंपा पोशि भरती 2022–23/नियुक्ती आदेश/40572024 नागपूर दि. 4/05/2025**

## –: आदेश :–

नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर या आस्थापनेवर घेण्यात आलेल्या अनुकंपा पोलीस शिपाई भरती प्रकिया सन 2022–2023 च्या भरतीमध्ये आपले अनुकंपा तत्वावर पोलीस शिपाई पदावर निवड झालेली आहे. आपण नवप्रविष्ठ पोलीस शिपाई या पदावर कर्तव्यावर हजर झाल्याचे तारखेपासुन पुढील अटी व शर्तीचे अधीन राहुन महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र असाधारण भाग 4 अ, दिनांक 30/01/2019 अन्वये पोलीस शिपाई पदाची सुधारीत वेतन संरचना एस–7 मध्ये वेतनश्रेणी रुपये 21700–69100 नुसार 21700/– अधिक विशेष वेतन रुपये 750/–या वेतनावर (इतर अनुज्ञेय भत्यासह) तात्पुरत्या व अस्थाई स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर आदेशातील नमुद उमेदवार खालील अटी व शर्ती मान्य असल्यास, त्यांनी नियुक्ती आदेश मिळाल्याच्या दिनांका पासुन पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे आवश्यक किट साहित्य, गणवेष व पुरेसा मेस अग्रीमासह न चुकता या आदेशान्वये केलेल्या नियुक्तीवर हजर राहावे व ते नियुक्तीवर हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व भविष्यात या नियुक्तीवर त्याचा/तिचा कोणताही दावा/तकार राहणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

| अ.क. | चेस्ट कमांक | उमेदवारांचे संपुर्ण नाव | लिंग | जात /प्रवर्ग | समांतर आरक्षण | नियुक्ती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अनुकंपा | विक्रम सुरज यादव | पुरूष | ओबीसी | ––– | खुला |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

1) नाव, जन्म तारीख, पुर्व चारित्र पडताळणी, शैक्षणिक पात्रता, वाहन चालक परवाना, जात व जात वैधता प्रमाणपत्र सामाजिक/समांतर आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असणारी प्रमाणपत्रे तपासणीच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्रे तपासणी अंती ग्राहय आढळुन आले नाही तर नियुक्ती रद्द करण्यात येईल व आपला कोणताही दावा राहणार नाही. तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास/वैद्यकिय तपासणीत/चारित्रपडताळणीत अपात्र ठरल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहिल, याबाबत उमेदवाराने नोंद घ्यावी.

2) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासणीसाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालया मध्ये मानसिक चाचणी ( Psychological Test ) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरण्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

3) पोलीस अमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस कायदा 1959, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सर्व नियम लागु राहतील. म्हणजेच प्रशिक्षण सेवा काळात त्यांची वर्तनुक चांगली व समाधानकारक नसल्यास त्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ सेवेतुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

4) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक मभाप—1087/14/सिआर—2 /87/20 दिनांक 30/12/1987 अन्वये प्रसिध्द् करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये नमुद नियम 4 मध्ये नमुद शर्तींची पुर्तता न करणा—या उमेदवारास सदर शासन निर्णयानुसार एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी परिक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे.

5) त्यांची पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाली असल्याने ते कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र ते विनंतीनुसार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर आंतरजिल्हा बदलीच्या तरतुदीनुसार 8 वर्षानंतर बदलीसाठी पात्र राहतील.

6) पोलीस अमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परीक्षा चार संधी मध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल जर चार संधीमध्ये ते संबंधीत परिक्षा उत्तीर्ण झाले नाही तर त्यांची/तिची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षीक वेतनवाढी त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

7) उमेदवाराचे नाव, जन्म तारीख, वय, उंची/छातीचे मोजमाप याबाबत काही तफावत आढळुन आल्यास तसेच चारित्र, पुर्वचारित्र तपासणी, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्राची छाननी केल्यानंतर अथवा भविष्यात काही आक्षेपार्ह आढळुन आल्यास नियुक्ती दिलेल्या उमेदवारास तात्काळ सेवेतुन कमी करण्यात येईल तसेच त्यांचे विरुध्द् फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येवुन त्यास शासकीय नौकरीस अपात्र असल्याचे घोषित करण्यात येईल.

8) देण्यात आलेली नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन 3 वर्षाच्या आत कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळुन आल्यास कारणे दाखवा नोटीस न देता अथवा कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास तात्काळ सेवेतुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

9) उमेदवारास मुख्यालय तसेच प्रशिक्षण विद्यालयात 9 महिण्यापर्यंत प्रशिक्षणार्थी पोलीस अमंलदार (शिपाई) म्हणुन पाठविण्यात येईल. प्रशिक्षण काळात त्यांची वागणुक, शिस्त समाधानकारक आढळुन न आल्यास व प्रशिक्षण काळात अनाधिकृतपणे गैरहजर राहील्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

10) नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो—1005/126/सेवा—4 दिनांक 31/10/2005 नुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहिल. त्यांना दिनांक 01/11/2005 पुर्वी अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही. त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागु राहील.

11) नियुक्त केलेल्या उमेदवारास शासनाने विहीत केलेली सर्व शपथपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करावी लागेल.

12) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधिल तरतुदी नुसार उमेदवारांना नमुना 'अ' या विहीत नमुण्यात लहान कुटूंबासंबंधिचे प्रतिज्ञापत्र देणे बंधणकारक आहे, त्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवाराकडील हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक 28/03/2005 नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे आपण नियुक्त झालेल्या पदासाठी अपात्र ठराल, त्याचप्रमाणे सध्या अविवाहीत उमेदवार विवाहित झाल्यावर त्यांचेकडील हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास सदरहु उमेदवार देखील नियुक्त करण्यात आलेल्या पदासाठी अपात्र ठरतील.

13) आपण कर्तव्यावर हजर होतांना आपले मुळ प्रमाणपत्र तसेच 2 संच छायांकित प्रती साक्षांकीत करुण सोबत घेवुन यावे.

14) कर्तव्यावर रुजु होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय राहणार नाही.

15) त्यांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी बंधनकारक राहतील.

16) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्रमांक पीसबी—3011/प्र.क्र.521/पोल—5 अ दिनांक 26/09/2011 नुसार पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारानी प्रशिक्षण कालावधी अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तिन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नौकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यात विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला खर्च, प्रशिक्षण कालावधीत त्यांना अदा केलेल्या वेतन, भत्ता सहीत वसुल करण्यात येईल. याबाबतचे बंधपत्र (बॉन्ड/हमीपत्र) सदरचा आदेश प्राप्त

झाल्यानंतर पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे हजर होते वेळेस भरुन देणे आवश्यक व बंधनकारक राहील.

17) नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारास दिनांक /05/2025 रोजी 10:00 वाजता पोलीस मुख्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर येथे रुजू व्हावे लागेल. विहीत मुदतीत उमेदवार नेमणुकीवर रुजू झाले नाही. तर ते ही नियुक्ती स्विकारण्यास तयार नाही असे समजण्यात येईल त्यानंतर त्यांचा या नेमणुकीवर कोणताही हक्क राहणार नाही.

18) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी संगणक ज्ञानाची किमान अर्हता नियुक्तीचे वेळी धारण करीत नसल्यास अशा उमेदवारास सदर अर्हता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक प्रशिक्षण/प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19/03/2003 प्रमाणे निश्चित केल्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या दिनांकापासुन 2 वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाचे कालावधीत त्यांनी विहीत संगणक अर्हता(एमएससीआयटी) प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संबंधीत कार्यालयास सादर करावे अन्यथा नियमा नुसार कार्यवाही करण्यात येईल.

19) उमेदवारांकडुन साक्षांकन नमुन्यातील अनु. क्र. 11 (अ), 15(1) क,ड,इ येथे त्याच्या विरुध्द् पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्हयाची माहिती दिली जात नाही. यास्तव उमेदवाराविरुध्द् या पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्ह्याची तपशीलवार माहिती तसेच न्यायालयाने दाखल गुन्हयात दोषमुक्त ठरविले असले तरीही साक्षांकन नमुन्यात माहिती नमुद न केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच चारित्र पडताळणी समाधानकारक आढळुन न आल्यास सदरहू उमेदवारास तात्काळ सेवामुक्त/सेवेतुन कमी करण्यात येईल.

20) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी–2011/प्र.क्र.1064/2011/16–ब, दिनांक 12/12/2011 व क्रमांक–बीसीसी–2012/प्र.क्र.332/12/16–ब, दिनांक 18/05/2013 चे अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपले जात प्रमाणपत्राची पडताळणी जात वैधता पडताळणी समितीकडून झाली नसेल तर आपणास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिण्याच्या आत आपली जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडुन करुन घेवुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तरी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समीतीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकीत प्रत कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर आपणास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल, आणि आपल्या विरुध्द् महाराष्ट्र अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 यातील तरतुदी नुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच याचिका क्रमांक 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक 25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे शासनातर्फे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडुन जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहुन आपली नियुक्ती करण्यात येत आहे.

21) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलातील बदलीसाठी पात्र राहणार नाही. मात्र ते विनंती नुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र राहतील.

**२) क्रमांक :-नाजिग्रा/ डि-९/अनुकंपा पो.अं. नियुक्ती /नविन बक्कल/४२३९/ २०२५नागपुर दिनांक २२/०५/२०२५**

## :- आदेश -:

नागपुर जिल्हा (ग्रामीण) नागपुर या आस्थापनेवर घेण्यांत आलेल्या अनुकंपा पोलीस शिपाई सन-२०२२-२३ च्या भरतीमध्ये या कार्यालयाचे आदेश या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/डि-९/पोशि भरती २०२२-२३/नियुक्ती आदेश/४०५७/२०२५, दिनाक १४/०५/२०२५ अन्वये, खालील नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना नियुक्ती देण्यांत आलेले असुन त्यांना नागपुर जिल्हा (ग्रामीण) नागपुर घटकात सामावुन घेवुन या घटकाच्या पोलीस दलात रिक्त असलेले बक्कल नंबर प्रदान करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवारांचे संपुर्ण नाव | लिंग | प्रदान करण्यात येणारे बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुकंपा | विक्रम सुरज यादव | पुरूष | १३१६ |

3)क्रमांकःनाजिग्रा/डि–9/सपोउपनि ते ग्रेड पोउपनि (**Grade PSI**) श्रेणी पदो./4775/2025 नागपूर दि. 10/06/2025

–::आदेश::–

या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/डि–9/सपोउपनि ते पोउपनि ( Grade PSI ) श्रेणी पदो./2025–565, दिनांक 17/01/2025 च्या आदेशान्वये खालील नमूद सहायक पोलीस उप निरीक्षकांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ( Grade PSI ) संबोधण्यात आलेले आहे. परंतु त्यांचे दि 20/01/2025 व दि. 24/01/2025 रोजी श्रेणी पोउपनि रद्द होणेसाठी केलेल्या विनंती अर्जानुसार तसेच त्यांना श्रेणी पोलीस उप निरीक्षक ( Grade PSI ) चे पद स्विकारावयाचे नसल्याने, सहायक पोलीस उप निरीक्षक याच पदावर राहून डयूटी करावयाची असल्याने व श्रेणी पोलीस उप निरीक्षक ( Grade PSI ) चे पद नाकारण्यात आल्याने त्यांचे श्रेणी पोलीस उप निरीक्षक ( Grade PSI ) चे पद रद्द करण्यात येत असुन त्यांना सहायक पोलीस उपनिरीक्षक याच पदावर समाविष्ठ करण्यात येत आहे.

| SR .NO | BK. NO | RANK | FULLNAME | CURRENT POSTING | ASI Pramotion | Grade PSI Pramotion |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 674 | ASI | PALASRAM DAULATRAO SURJUSE | CR | 22/11/2021 | 17/01/2025 |
| 2 | 1614 | WASI | KALPANA SANJAY MESHRAM | CR | 22/11/2021 | 17/01/2025 |

**४)क्रमांकः—नाजिग्रा/डि—९/पोशि भरती २०२२—२३/नियुक्ती आदेश/४७८५/२०२५ नागपूर दिनांक ११/०६/२०२५**

**—: आदेश :—**

नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर या आस्थापनेवर घेण्यात आलेल्या पोलीस शिपाई भरती सन २०२२—२०२३ च्या भरतीमध्ये आपल्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या सामाजिक व समांतर आरक्षण प्रवर्गात निवड करण्यात आली असल्याने आपली नवप्रविष्ठ पोलीस शिपाई या पदावर कर्तव्यावर हजर झाल्याचे तारखेपासुन पुढील अटी व शर्तीचे अधीन राहुन महाराष्ट्र शासन यांचे राजपत्र असाधारण भाग ४ अ, दिनांक ३०/०१/२०१९ अन्वये पोलीस शिपाई पदाची सुधारीत वेतन संरचना एस—७ मध्ये वेतनश्रेणी रुपये २१७००—६९१०० नुसार २१७००/— अधिक विशेष वेतन रुपये ७५०/—या वेतनावर (इतर अनुज्ञेय भत्यासह) तात्पुरत्या व अस्थाई स्वरुपात नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर आदेशातील नमुद उमेदवार खालील अटी व शर्ती मान्य असल्यास, त्यांनी नियुक्ती आदेश मिळाल्याच्या दिनांका पासुन पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे आवश्यक किट साहित्य, गणवेष व पुरेसा मेस अग्रीमासह न चुकता या आदेशान्वये केलेल्या नियुक्तीवर हजर राहावे व ते नियुक्तीवर हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल व भविष्यात या नियुक्तीवर त्याचा/तिचा कोणताही दावा/तक्रार राहणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

| अ. क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवारांचे संपुर्ण नाव | लिंग | जात /प्रवर्ग | नियुक्ती प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५१२३ | उदय लच्छीराम यादव | पुरूष | खुला | खुला | माजी सैनिक |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) नाव, जन्म तारीख, पुर्व चारित्र पडताळणी, शैक्षणिक पात्रता, वाहन चालक परवाना, जात व जात वैधता प्रमाणपत्र सामाजिक/समांतर आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता आवश्यक असणारी प्रमाणपत्रे तपासणीच्या अधिन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्रे तपासणी अंती ग्राहय आढळुन आले नाही तर नियुक्ती रद्द करण्यात येईल व आपला कोणताही दावा राहणार नाही. तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास/वैद्यकिय तपासणीत/चारित्रपडताळणीत अपात्र ठरल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहिल, याबाबत उमेदवाराने नोंद घ्यावी.

२) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासणीसाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test ) घेण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

३) पोलीस अमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस कायदा १९५९, मुबंई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सर्व नियम लागु राहतील. म्हणजेच प्रशिक्षण सेवा काळात त्यांची वर्तनुक चांगली व समाधानकारक नसल्यास त्यांना कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ सेवेतुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक मभाप—१०८७/१४/सिआर—२ /८७/२० दिनांक ३०/१२/१९८७ अन्वये प्रसिध्द् करण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये नमुद नियम ४ मध्ये नमुद शर्तींची पुर्तता न करणा—या उमेदवारास सदर शासन निर्णयानुसार एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी परिक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे.

५) त्यांची पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाली असल्याने ते कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र ते विनंतीनुसार जिल्ह्याच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर आंतरजिल्हा बदलीच्या तरतुदीनुसार ८ वर्षांनंतर बदलीसाठी पात्र राहतील.

६) पोलीस अमलदार (शिपाई) या पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहित केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परीक्षा चार संधी मध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल जर चार संधीमध्ये ते संबंधीत परिक्षा उत्तीर्ण झाले नाही तर त्यांची/तिची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षीक वेतनवाढी त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

७) उमेदवाराचे नाव, जन्म तारीख, वय, उंची/छातीचे मोजमाप याबाबत काही तफावत आढळुन आल्यास तसेच चारित्र, पुर्वचारित्र तपासणी, शैक्षणिक पात्रता, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, इत्यादी कागदपत्राची छाननी केल्यानंतर अथवा भविष्यात काही आक्षेपार्ह आढळुन आल्यास नियुक्ती दिलेल्या उमेदवारास तात्काळ सेवेतुन कमी करण्यात येईल तसेच त्यांचे विरुध्द् फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात येवुन त्यास शासकीय नौकरीस अपात्र असल्याचे घोषित करण्यात येईल.

८) देण्यात आलेली नेमणुक ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन ३ वर्षाच्या आत कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळुन आल्यास कारणे दाखवा नोटीस न देता अथवा कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास तात्काळ सेवेतुन कमी करण्याचे अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील.

९) उमेदवारास मुख्यालय तसेच प्रशिक्षण विद्यालयात ९ महिण्यापर्यंत प्रशिक्षणार्थी पोलीस अमंलदार (शिपाई) म्हणुन पाठविण्यात येईल. प्रशिक्षण काळात त्यांची वागणुक, शिस्त समाधानकारक आढळुन न आल्यास व प्रशिक्षण काळात अनाधिकृतपणे गैरहजर राहील्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१०) नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो—१००५/१२६/सेवा—४ दिनांक ३१/१०/२००५ नुसार नविन परिभाषीत

अंशदान निवृत्ती योजना लागु राहिल. त्यांना दिनांक ०१/११/२००५ पुर्वी अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन, निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही. त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) लागु राहील.

११) नियुक्त केलेल्या उमेदवारास शासनाने विहीत केलेली सर्व शपथपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करावी लागेल.

१२) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधिल तरतुदी नुसार उमेदवारांना नमुना 'अ' या विहीत नमुण्यात लहान कुटूंबासंबंधिचे प्रतिज्ञापत्र देणे बंधणकारक आहे, त्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवाराकडील हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे आपण नियुक्त झालेल्या पदासाठी अपात्र ठराल, त्याचप्रमाणे सध्या अविवाहीत उमेदवार विवाहित झाल्यावर त्यांचेकडील हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास सदरहु उमेदवार देखील नियुक्त करण्यात आलेल्या पदासाठी अपात्र ठरतील.

१३) आपण कर्तव्यावर हजर होतांना आपले मुळ प्रमाणपत्र तसेच २ संच छायांकित प्रती साक्षांकीत करुण सोबत घेवुन यावे.

१४) कर्तव्यावर रुजु होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय राहणार नाही.

१५) आपण पोलीस आस्थापना नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाची रिक्त पदे भरण्यासाठी पोलीस आस्थापना नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर दलाच्या वेबसाईटवर दिनांक ०१/०३/२०२४ रोजी प्रसिध्द् करण्यात आलेल्या सविस्तर जाहिरातीच्या परिच्छेद ०२ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदीनुसार पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर घटका व्यतिरीक्त अन्य पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक यांचे घटकात पोलीस शिपाई पदासाठी अर्ज सादर केला नसल्याबाबतचे बंधपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यांनी पोलीस शिपाई पदासाठी एकापेक्षा अधिक घटकात अर्ज सादर केल्याचे नियुक्ती दरम्यान किंवा नियुक्तीनंतर केव्हाही निदर्शनास आल्यास जाहिरातीच्या परिच्छेद ०२ मध्ये नमुद तरतुदींचा भंग केल्याचे कारणावरुन त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.

१६) त्यांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी बंधनकारक राहतील.

१७) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्रमांक पीसबी—३०११/प्र.क्र.५२१/पोल—५ अ दिनांक २६/०९/२०११ नुसार पोलीस शिपाई पदावर निवड झालेल्या उमेदवारानी प्रशिक्षण कालावधी अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तिन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नौकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यात विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला खर्च, प्रशिक्षण कालावधीत त्यांना अदा केलेल्या वेतन, भत्ता सहीत वसुल करण्यात येईल. याबाबतचे बंधपत्र (बॉन्ड/हमीपत्र) सदरचा आदेश प्राप्त झाल्यानंतर पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर येथे हजर होते वेळेस भरुन देणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१८) नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारास दिनांक ११/०६/२०२५ रोजी १०.०० वाजता पोलीस मुख्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर येथे रुजू व्हावे लागेल. विहीत मुदतीत उमेदवार नेमणुकीवर रुजू झाले नाही. तर ते ही नियुक्ती स्विकारण्यास तयार नाही असे समजण्यात येईल त्यानंतर त्यांचा या नेमणुकीवर कोणताही हक्क राहणार नाही.

१९) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी संगणक ज्ञानाची किमान अर्हता नियुक्तीचे वेळी धारण करीत नसल्यास अशा उमेदवारास सदर अर्हता शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग पत्र क्रमांक प्रशिक्षण/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ प्रमाणे निश्चित केल्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या दिनांकापासुन २ वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाचे कालावधीत त्यांनी विहीत संगणक अर्हता(एमएससीआयटी)

प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र संबंधीत कार्यालयास सादर करावे अन्यथा नियमा नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२०) उमेदवारांकडुन साक्षांकन नमुन्यातील अनु. क्र. ११ (अ), १५(१) क,ड,इ येथे त्याच्या विरुध्द् पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्हयाची माहिति दिली जात नाही. यास्तव उमेदवाराविरुध्द् या पुर्वी दाखल झालेल्या खटल्याची/गुन्ह्याची तपशीलवार माहिति तसेच न्यायालयाने दाखल गुन्हयात दोषमुक्त ठरविले असले तरीही साक्षांकन नमुन्यात माहिति नमुद न केल्याचे निदर्शनास आल्यास तसेच चारित्र पडताळणी समाधानकारक आढळुन न आल्यास सदरहू उमेदवारास तात्काळ सेवामुक्त/सेवेतुन कमी करण्यात येईल.

२१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी–२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६–ब, दिनांक १२/१२/२०११ व क्रमांक–बीसीसी–२०१२/प्र.क्र. ३३२/१२/१६–ब, दिनांक १८/०५/२०१३ चे अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपले जात प्रमाणपत्राची पडताळणी जात वैधता पडताळणी समितीकडून झाली नसेल तर आपणास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिण्याच्या आत आपली जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडुन करुन घेवुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तरी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समीतीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकीत प्रत कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर आपणास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल, आणि आपल्या विरुध्द् महाराष्ट्र अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० यातील तरतुदी नुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल. तसेच याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे शासनातर्फे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडुन जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधिन राहुन आपली नियुक्ती करण्यात येत आहे.

२२) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आलेले उमेदवार हे कार्यकारी पोलीस दलातील बदलीसाठी पात्र राहणार नाही. मात्र ते विनंती नुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र राहतील.

5)क्रमांकःनाजिग्रा/डि–9/ सपोउपनि ते ग्रेड पोउपनि (**Grade PSI**) श्रेणी पदो./4774 /2025 नागपूर दि. 10/06/2025

–::आदेश::–

महाराष्ट्र शासन गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक पीएमएन 0821/प्र.क.533/ पोल–5ब,दिनांक 25/02/2022 अन्वये पोलीस नाईक हा संवर्ग रद्द करून या संवर्गातील पदे पोलीस शिपाई,पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गामध्ये वर्ग करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयामधील सुचना/आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी मा. पोलीस महासंचालक यांनी त्यांच्या स्तरावर सुकाणु समिती गठीत करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

वरील शासन निर्णयानुसार मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षते खाली दिनांक 08/03/2022 अन्वये सुकाणु समिती स्थापन केली. सदर समितीच्या दिनांक 14/03/2022 चे पत्र व व्हिडीओ कॉन्फरेन्सद्वारे दिनांक 11/04/2022 रोजी राज्यांतर्गत घटक प्रमुख यांच्याबरोबर बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार शासनाचे अधीन राहुन सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याची कार्यवाही करणेकामी खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

1. पोलीस दलामध्ये एकुण 30 वर्षे सेवापुर्ण
2. सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर किमान 03 वर्षे सेवा पुर्ण.
3. पोलीस उपनिरीक्षक संवर्ग पदाची वेतन घेत असलेले (म्हणजेच जे सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे मुळ वेतन हे पोलीस उपनिरीक्षक वेतन आयोगातील **Level S-**14.–38600 पेक्षा जास्त आहे.)

महाराष्ट्र शासन गृह विभाग,शासन निर्णय कमांक पीएमएन 0821/प्र.क.533/ पोल–5ब,दिनांक 25/02/2022 मधील निर्देशानुसार व मा.अपर पोलीस महासंचालक,आस्थापना यांचेकडील पोमसं/6/पदोन्नती/ग्रेड–पीएसआय/34/2022,दिनांक 28/03/2022 व अध्यक्ष सुकाणु समिती तथा मा. अपर पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांचेकडील पोमसं/6/पदोन्नती/ग्रेड–पीएसआय/34/2022,दिनांक 22/04/2022 मधील विहीत अटींच्या अधिन राहुन या आस्थापनेवरील जे सहायक पोलीस उपनिरीक्षक विहीत निकष पुर्ण करीत आहेत त्यांना श्रेणी पोलीस उप निरीक्षक

(**Grade PSI**) संबोधण्याकरीता पोलीस अधीक्षक,नागपूर ग्रामीण,जिल्हा नागपूर आस्थापना मंडळाची बैठक दिनांक 06/06/2025 रोजी आयोजित करण्यात आली होती. मंडळाच्या शिफारशीनुसार अटी शर्ती चे तरतुदीनुसार खालील नमुद सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याबाबत मान्यता देण्यात आलेली असल्याने आदेशाच्या दिनांकापासून सहायक पोलीस उप निरीक्षक यांना श्रेणी पोलीस उप निरीक्षक (**Grade PSI**) असे संबोधिण्यात येत आहे.

| SR .NO | BK.NO | RANK | FULLNAME | Category | POSTING | Date of Joining ( 30 year Complet ) | ASI Pramotion Date ( 3 Year Complete) | 7th Pay Basic ( 38600) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | 859 | DASI | DILIP GAJANAN JOSHI | OPEN | MT | 10/Feb/86 | 22/Nov/21 | 52600 |
| 2 | 1522 | ASI | GANESH HARIHAR RAI | OPEN | CRO | 08/Mar/89 | 06/Jan/22 | 51100 |
| 3 | 467 | ASI | SUNILCHADRIKAPRASAD MISHRA | OPEN | KALMESHWAR | 19/Feb/89 | 06/Jan/22 | 52600 |
| 4 | 694 | ASI | AJIT SHIVPRASAD THAKUR | OPEN | UMRED | 31/Dec/89 | 09/Feb/22 | 52600 |
| 5 | 1270 | ASI | ASHOKSINGH PARMANAD THAKUR | OPEN | BHIVAPUR | 31/Dec/89 | 09/Feb/22 | 52600 |
| 6 | 1297 | ASI | NARAYAN DEBAJI BORKAR | OBC | SAONER | 07/Feb/90 | 18/May/22 | 51100 |

नमुद श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (**Grade PSI**) यांना नियमीत पोलीस उपनिरीक्षक या पदात पदोन्नती मिळेपर्यंत ते सहायक पोलीस उपनिरीक्षकाचीच कर्तव्ये व जबाबदा—या पार पाडतील.

उपरोक्त नमुद केलेल्या श्रेणी पोलीस उपनिरीक्षकांपैकी एखाद्या विरूध्द आता गुन्हा दाखल झाला असेल /निलंबनाची कार्यवाही केली असेल/न्यायायलीन प्राकरण प्रलंबित असेल/विभागीय चौकशी अगर शिस्तभंगाविषयक कार्यवाही चालु असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर अशा श्रेणी पोलीस उपनिरीक्षक यांचे प्रभारी अधिकारी यांनी त्याबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

वर नमुद श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म्हणुन संबोधन केवळ वैयक्तिक रित्या राहिल व संबंधित सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे सेवानिवृत्ती पर्यंत किंवा ते पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमीत पदोन्नती होईपर्यंत लागू राहील.

तसेच नमुद श्रेणी पोलीस उपनिरीक्षक म्हणुन संबोधीत करण्यात येणा—या अधीका—यांच्या गणवेषात अतिरिक्त एक स्टार समाविष्ठ करण्यात यावा. त्यानुसार गणवेषातील अनुषंगीक बदल्याच्या दृष्टीकोणातुन मुंबई पोलीस मॅन्युअल 1959 खंड 1 प्रकरण 7 अंतर्गत आवश्यक ते बदल करण्यात येत आहेत.

• श्रेणी पोलीस उप निरीक्षक ( **Grade PSI** ) संबोधिण्यात येणा—या नमुद सहायक पोलीस उप निरीक्षक यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. •

# भाग —2 (रजा,वेतननिश्चती)

**१)क्र.:-नाजीग्रा/आस्था-डी-९सी/अ.गै/पोहवा-१९२७/ / नागपुर दि. १२/०६/२०२५**

**:- आदेश -:**

खालील नमूद महिला पोलीस अंमलदार हे वैद्यकीय कारणास्तव सिक रजेवर असल्याने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे रजा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदा-याचे नाव ब.न. | नेमणूक | रजेचा कालवधी | एकूण दिवस | मंजूर रजेचा प्रकार | प्राधिकार |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **पोहवा-१९२७ शंकर सुखदेव मडावी** | आरोली | २८/१२/२०२४ ते ०६/०१/२०२५ | **०९ दिवस** | **असाधारण रजा** | नियम -६३ |

2)क्रमांकः–नाजिया/डी–9–बी/सफौ/1510/परीवर्तीत /4858/2025 नागपुर दिनांकः– 12/06/2025

– :आदेशः–

सफौ/1510 संतोषकुमार सुरेश शर्मा नेमणुक पो.स्टे.नरखेड नागपुर ग्रामीण यांचा अपघात झाल्याने सिक रजेवर होते दिनांक 12.06.2025 रोजी कर्तव्यावर हजर होने करीता आज्ञाकिंत कक्षा मध्ये वैद्यकीय प्रमाणपत्रासह आल्याने यांची महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 नियम 61 नुसार सिक कालावधी वैद्यकीय प्रमाणपत्राचे आधारे वैद्यकीय कारणास्तव खालील नमुद कॉलम नुसार रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नांव व हुद्दा ब.न. | नेमणुक | रजेचा कालावधी | दिवस | रजेचा प्रकार | प्राधिकार |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | सफौ/1510 संतोषकुमार सुरेश शर्मा | पो.स्टे.नरखेड नागपुर ग्रामीण | दि.21.03.2025 ते 12.06.2025 | 80 दिवस | परीवर्तीत रजा | नियम–61 |

**३)नाजिग्रा / डी-9डी / मपोशि-२६८/ बालसंगोपन रजा / ४२३३९ / २०२५ नागपुर दिनांक १३/०६/२०२५**

**-:आदेश :-**

खालील नमुद मपोशि यांना शासन निर्णय वित्त विभाग शानि कमांक सकीर्ण-2017/प्र.क्र.25/सेवा-6 दिनांक 23 जुलै 2018 अन्वये 180 दिवसाच्या कमाल मर्यादेत बाल संगोपन रजा मजुर करता येईल असे नमुद असुन अनुच्छेद( II) नुसार बालसंगोपन रजा मंजूर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **नाव व बं.न. हुद्दा** | **नेमणूक** | **दिवस** | **रजेचा प्रकार** |
|---|---|---|---|---|
| 1 | मपोशि/ २६८ शुभांगी खुशाल मस्के | अरोली | ६० | बालसंगोपन रजा |

4) **क्र:-नाजिग्रा /डी-9डी / नापोशि -क.म./वाढई /परिवर्तीत,अर्जित रजा /** 41305/ 2025 **नागपुर दिनांक** 09/ 06/ 2025

**आदेश**

नापोशि/ कर्मशाळा मदतनीस भोजराज पांडुरंग वाढई, नेमणुक पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, नागपूर ग्रामीण, नागपूर.यांचा गैरहजर कालावधी खालील नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 61,50 अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | दिवस | रजेचा प्रकार | नियम |
|---|---|---|---|---|
| 1 | 14/07/2024 ते 10/01/2025 | 181 | परिवर्तीत रजा | 61 |
| 2 | 11/01/2025 ते 07/05/2025 | 117 | अर्जित रजा | 50 |

5) **क्र:-नाजिग्रा /डी-9डी / मपोशी** -1513 **/परिवर्तीत रजा** /4976/ 2025 **नागपुर दिनांक** 13/ 06/ 2025

**आदेश**

मपोशि/ 1513 जयश्री प्रविण गोडंगे नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण,नागपूर.यांची खालील नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 61, 50 अन्वये वैदकीय कागदपत्राच्या आधारे रजा मंजूर करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **दिनांक** | **दिवस** | **रजेचा प्रकार** | **नियम** |
|---|---|---|---|---|
| 1 | 20/05/2025 ते 26/05/2025 | 07 | परिवर्तीत रजा | 61 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | 27/05/2025 ते 13/06/2025 | 18 | अर्जित रजा | 50 |

**6)क्र:-नाजिग्रा / डी-9डी / चापोशी -2007 / अर्जित रजा / 41302 / 2025 नागपुर दिनांक 06 / 06/ 2025**

**आदेश**

खालील नमुद चालक महिला पोलीस अंमलदार यांनी मागितलेली वाढीव अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व बक्क्ल नंबर | नेमणूक | अर्जित रजा |
|---|---|---|---|
| 1 | चामपोशी/ 2007 आचल श्याम तिवारी | मोटार परिवहन विभाग | 15 दिवस वाढीव अर्जित रजा |

**7)क्र:-नाजिग्रा / डी-9डी / चापोशी -2104 / अर्जित रजा / 42208 / 2025 नागपुर दिनांक 12 / 06/ 2025**

**आदेश**

खालील नमुद चालक पोलीस अंमलदार यांनी मागितलेली वाढीव अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व बक्क्ल नंबर | नेमणूक | अर्जित रजा |
|---|---|---|---|
| 1 | चापोशी / 2104 कपिल संभाजी केंद्रे | मोटार परिवहन विभाग | 05 दिवस वाढीव अर्जित रजा मंजूर. |

**8)क्र:-नाजिग्रा/ डी-9डी/पोशि-2248/ गैरहजर/42202/ 2025 नागपुर दिनांक 12/ 06/ 2025**

**-:आदेश:-**

पोशि/2248 शेषराव उके नेमणुक पोस्टे. रामटेक यांचा महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 63 अन्वये दिनांक 11/09/2023 ते 20/12/2023 पर्यत 101 दिवस अनधिकृतपणे गैरहजर कालावधी असाधारण रजा मंजूर करण्यात येत आहे.

# भाग —३ (कसुरी,शिक्षा)

# निरंक

# भाग—४ (बक्षिस आदेश)

**क्रमांक नाजिग्रा /डी-१४/अ.पो.महा/ बक्षिस अहवाल/ 41709/२०२५, नागपूर दिनांक -: 10/०6/२०२५**

**आदेश**

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस अंमलदार यांना राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज यांचे पत्र क्रमांक :रारापोबलननानवीजदौंड पुणे/२०२५/८१४/१-आशा/बक्षीस/प्रकेना/,दिनांक १७२०२५/०२/ पत्रान्वये येथे जिल्हा कवायत निर्देशक कोर्स सत्र क्र५७मधील नमुद १५२. पोलीस अंमलदार प्रशिक्षणार्थी यांचे प्रशिक्षण केंद्र नानवीज येथे दिनांक २७ते २०२५.०१. दरम्यान जंगल क २०२५.०२.०१ॅम्पीग प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होतेयांनी १५२.प्रशिक्षणाची सत्र क्र ५७क्रश् ते .दरम्यान अ . विविध प्रात्यक्षिके यांचे प्रशिक्षण देवून उत्तम प्रकार सादरीकरण केल्याबददल प्रोत्साहन पर प्राचार्य राज्य राखीव पोलीस बल, प्रशिक्षण केंद्र ,नानवीज यांनी बक्षिस मंजुर केले आहे.

| अ.क्र | हुददा | प्रशिक्षणार्थीचे नांव | बक्षिसाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | पोशी /४७७ | मंगेश पुंडलिक बकाल | रु.१००/- व जीएसटी |
| २ | पोशी /११२५ | लोमेश विनोद पारखी | रु.१००/- व जीएसटी |
| | | **एकूण** | **रुपये. २००/-** |

**क्रमांक नाजिग्रा/डी.१४/बक्षिस अहवाल/मंत्रालयीन कर्मचारी/४७३८/२०२५ नागपूर दिनांक १०/०६/२०२५**

आदेश

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील मंत्रालयीन कर्मचारी यांनी कार्यालय अधिक्षक यांचे मार्गदर्शनात महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक :बीसीसी२०२४/प्र.क्र.७५/१६—क,मुंबई दिनांक २७/०२/२०२४ अन्वये ‘‘सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग’’ करीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित विंदुनामावली विहित करणेबाबत (एसईबीसी-SEBC) मराठा समाजाचा नवीन वर्ग तयार करण्यात आलेला असून सरळसेवा भरतीच्या १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले असून त्याची नोंद खुल्या प्रवर्गात नवीनवर्ग तयार करून शासनाचे दिलेले निर्देशानुसार बिंदुनामावली तयार केले. त्याअनुषंगाने दिनांक ०१/०९/२०२४ पर्यतची १०० बिंदुनामावली सरळसेवा पोलीस आस्थापना,नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर या आस्थापनेवरील कार्यरत पोलीस शिपाई पदसंख्या, आरक्षण व शिल्लक पदांची माहिती तयार करून मा. सहायक आयुक्त मागास वर्ग कक्ष,नागपूर विभाग,नागपूर यांचे कडून सादर करून प्रमाणित केले.

त्यांचे कामकाज प्रशसनीय स्वरूपाचे असल्याने त्यांची कार्यक्षमता व बुध्दीमता पाहुन त्यांच्या या चांगल्या कामगिरी बद्दल व त्यांनी भवि यातही अशाप्रकारे चांगली कामगिरी करावी या करीता पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रोत्साहन म्हणुन प्रशंसापत्र व सि नोट मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | मंत्रालयीन कर्मचारी यांचे नाव | पदनाम | मंजुर बक्षिस |
|---|---|---|---|
| १ | श्री. उमेश गहिनिनाथ फुंदे | कार्यालय अधिक्षक | प्रशंसापत्र व सि नोट |
| २ | श्रीमती. कल्पना राजेश चिमणकर | प्रमुख लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| ३ | श्री. मनिष छुन्नुलाल कनोजिया | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |

**क्रमांक नाजिग्रा/डी.१४/बक्षिस अहवाल/मंत्रालयीन कर्मचारी/४७३७/२०२५ नागपूर दिनांक १०/०६/२०२५**

<u>आदेश</u>

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील मंत्रालयीन कर्मचारी यांनी कार्यालय अधिक्षक यांचे मार्गदर्शनात दिनांक 19/06/2024 ते 29/06/2024 पासून रिक्त 124 पदांची पोलीस शिपाई भरती व 05 पदांची पोलीस शिपाई चालक भरती—2022—2023 मध्ये मा. पोलीस महासंचालक यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचना चे काटेकोर पणे पालन करून पोलीस भरती संबधित दिलेले सर्व कामे पारपाडले होती. तसेच पोलीस शिपाई/ चालक पोलीस भरती दरम्यान कोणताही गैरप्रकार व लाचलुचपतचा प्रकार घडलेला नाही.

| अ.क्र | मंत्रालयीन कर्मचारी यांचे नाव | पदनाम | मंजुर बक्षिस |
|---|---|---|---|
| 1) | श्री. उमेश फुंदे | कार्यालय अधिक्षक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 2) | श्री.सुधाकर कोये, | प्रमुख लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 3) | श्रीमती कल्पना चिमणकर, | प्रमुख लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 4) | श्रीमती पपीहरा काटकर, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 5) | श्री. विनोद चव्हाण | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 6) | श्री. राजेश बंडावार, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 7) | श्री. अखिलेश साव, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 8) | श्री. अशोक आटे, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 9) | श्री. राजेंद्र पिंगळे, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 10) | श्रीमती चंचल राजुरकर, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 11) | श्रीमती ममता जोशी, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 12) | श्रीमती योगीनी मोटघरे | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 13) | श्रीमती रंजना चिमोटे, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 14) | श्रीमती प्रतिभा पौनीकर, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 15) | श्रीमती रुथ यंगड, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |

| | | | |
|---|---|---|---|
| 16) | श्रीमती पुष्पा मंडल, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 17) | श्रीमती ममता अलेवार | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 18) | श्रीमती ज्योती शेन्डे, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 19) | श्री.दिलीप खंडाते, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 20) | श्री.विरेंद्र उरकुडे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 21) | श्री.मनिष कनोजिया, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 22) | श्री.सुमेध कानेकर, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 23) | श्री.गुलाब कुमरे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 24) | श्री.खेमचंद जाधव, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 25) | श्रीमती बबिता भगत, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 26) | श्री. दिपक दळवी, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 27) | श्री. ज्ञानेश्वर हिवाळे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 28) | श्री. चंदु रुईकर, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 29) | श्री. रविंद्र जिवतोडे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 30) | श्री. ग्रेनविल विलीयम, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 31) | श्री. प्रविण रंदाळे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 32) | श्री. राजु चाके, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 33) | श्रीमती रिना मानकर, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 34) | श्रीमती अर्पणा कुकडे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 35) | श्रीमती निर्मला भुरकुंडे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 36) | श्रीमती प्रज्ञा अगम, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 37) | श्रीमती दिपाली चौधरी, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 38) | श्रीमती रेखा दुबे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 39) | श्रीमती रोहिनी चवळे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 40) | श्रीमती लता कोकाटे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 41) | श्रीमती ज्योती मेश्राम, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 42) | श्रीमती शेफाली वहाणे, | कनिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 43) | श्रीमती निता ठोंबरे, | वरिष्ठ श्रेणी लिपीक | प्रशंसापत्र व सि नोट |
| 44) | श्री. राहुल खोब्रागडे | कार्यालयीन शिपाई | प्रशंसापत्र व सि नोट |
| 45) | श्री. संजय चौव्हाण | कार्यालयीन शिपाई | प्रशंसापत्र व सि नोट |
| 46) | श्रीमती. चंदा उईके | कार्यालयीन शिपाई | प्रशंसापत्र व सि नोट |
| 47) | श्रीमती. नेहा यादव | कार्यालयीन शिपाई | प्रशंसापत्र व सि नोट |

# भाग —५ (प्रशिक्षण,परवानगी,अग्रीम)

**१) कमांक:नाजिग्रा/डी-१४/ फ्लैट खरेदी परवानगी/ चापोशी/२२०८/41712/२०२५, नागपूर दिनांक :-१०/०५/२०२५**

**-: आदेश :-**

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील पोटनियम १९ (२) च्या तरतुदीनुसार त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे मालमत्ते वर खालील नमूद अटी चे अधीन राहून फ्लैट खरेदी करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव व नेमणूक | मालमत्ते विवरण | प्लॉट खरेदीची एकुण किमत |
|---|---|---|---|
| 1 | चापोशी/2208 सुदत्त सुरेश पाटील, नेमणुक पोलीस स्टेशन रामटेक, नागपूर ग्रामीण | मौजा-नारी , खसरा नं/सर्वे नं -87/2, प.ह.नं-11,प्लांट क्र. 03, येथील गणेश नार्थस्टार-1 बिल्डींग मधील सी विंग, दुसरा माळेत फ्लैट नं-206. | एकुण किंमत रूपये 36,50,000/- |

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांनी फ्लैट खरेदी खर्चाच्या हिशोबाची कागदपत्रे स्वतःजवळ सांभाळुन ठेवावी व वरिष्ठांनी मागणी केल्यास वेळीच सादर करावी.

**२)क्रमांक पोअनाजिग्रा /डि-९ सी /मपोहवा-१७३९पाटिल /परवानगी /२२६५१७२/२०२५ नागपुर दि. १२/०६/२०२५**

**:-आदेश -:**

मपोहवा/१७३९ रुपाली हरीश पाटील नेमणुक,पोलीस मुख्यालय,नागपुर ग्रामीण यांना देव दर्शनाकरीता दिनांक ४/०७/२०२५ ते १९/०७/२०२५ पर्यत कैलास मानसरोवर **(तिब्बत चायना)** येथे जाण्यांची परवानगी खालील शासन निर्णयाच्या अटि व शर्तीच्या अधीन राहुन देण्यांत येत आहे.

**अटि व शर्ती**

**महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक परदौ-१४२०/प्र.क्र.२६/११दिनांक ०१/०२/२०२१ चे परिपत्रक अन्वये,**

१) शासनाचे अधिकारी /कर्मचारी स्वखर्चाने रजा घेवुन विदेशात प्रशिक्षण,चर्चासत्र ,शोधनिबंध सादर करणे अशा कारणांसाठी जात असतील आणि त्यांच्या विदेश दौ-यामुळे शासनावर आर्थिक भार पडत नसेल तर अशी प्रकरणे शिफारस समीती समोर सादर करण्यांची आवश्यक नाही.तथापी अशा प्रकारची शासन स्तरावर मान्यता घेण्यांत यावी व दौ-याच्या कालावधीत संबधीत अधिकाराकडुन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतणुक)नियम१९७९ मधील कोणत्यही तरतुदीचा भंग केला जाणार नाही अशी अट मंजुर आदेशात सामाविष्ट करण्यांत यावी.या प्रकरणाची कोणत्याही संस्थेकडुन प्रवासखर्च,विदेशी वास्तवव्याच्या खर्च वा अन्य कोणत्यही प्रकारचे आदरातिथ्य स्वाकारु नये,

२) विदेशात राहणा-या नातेवाईकांना भेटले पर्यटन,वैदयकिय उपचार घेणे अशा खाजगी कारणांसाठी करावयांच्या विदेश दौ-यांच्या प्रकरणामध्ये प्रस्ताव शिफारस समीतीसमोर सादर करण्यांची आवश्यकता नाही.मात्र अशा प्रकरणी अधिकारी /कर्मचा-यासं रजा मंजुर करण्यांस सक्षम असणा-या प्राधिका-याची पुर्व परवानगी घेण्यांत यावी. या प्रकारचे दौरे कोणत्याही खाजगी /वाणिज्यिक संस्थेच्या आमंत्रणावरुन करु नयेत व अशा कोणत्यही संस्थेकडुन प्रवासखर्च,विदेशी वास्तव्याच्या खर्च वा अन्य कोणत्याही प्रकारचे आदरातिथ्य स्वीकारु नये.

Signed by Umesh Ghaninath Funde
Date: 14-08-2025 17:27:28

**(उमेश फुंदे)**
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,कार्यालय
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

प्रति,
सर्व ठाणेदार/रापोनि.मुख्या./बि.संदेश/जि.वि.शा/नियं.कक्ष/स्था.गु.शा./मो.प.वि./पो.अधि.वा.शाखा/अ.पो.अधि.वा.शाखा/म.त.नि/कार्या अधिक्षक/डी—४/डी—७/डी—९बी/डी—११/डी—१२/डी —१३/ डी —९—बी/ डी —९—सी/डी —९—डी/लघुलेखक/ वे.नि.लपीक/ कल्याणशाखा/सुरक्षाशाखा / वाहतुक शाखा ना.ग्रा.
प्रत सस्नेह अग्रेषित :— अ.पो.अधि.नाग्रा/महामार्ग सूरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण केंद्र.
प्रतिलिपी :— पो.उप अधि.(गृह) व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ना.ग्र. यांना आवश्यक कार्यवाहीस
२/— सदरची मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका ही रोलकॉलवर वाचून दाखविण्यात यावी व संबंधितास समज देऊन त्यांचा नावापूढे त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.